



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक




● वर्ष : ०३ ● अंक : ०८१ ● पुणे ● बुधवार, दि. ०३ डिसेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


# कुठे स्वबळ तर कुठे युती

## 'पुणे' राजकारणात संशयकल्लोळ | पुण्यातील राजकीय पक्षांसह अनेक नेते संभ्रमात

**प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्यापासून शहरातील राजकीय वातावरण तापलं आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष एकमेकांच्या हालचालींवर सतत नजर ठेवून आहेत. कुठे स्वबळाचा धीट दावा, तर कुठे आघाडीसाठी पडद्यामागील बैठका-एकूणच 'पुणे' राजकारणात संशयकल्लोळ शिगेला पोहोचला आहे.




- **भाजप : 'मिशन १२५'चा आत्मविश्वास, स्वबळावर लढण्याची तयारी**

२०17 च्या निवडणुकीत तब्बल ९७ नगरसेवक निवडून देणाऱ्या पुणेकरांनी भाजपला स्पष्ट बहुमत दिलं होतं. याच जोरावर भाजपने यंदाच्या निवडणुकीसाठी 'मिशन १२५' निश्चित केलं आहे. महायुतीच्या नावाखाली जागावाटपाचा पेच नको- यामुळे भाजपच्या स्थानिक नेतृत्वाचा कल स्वबळावर लढण्याकडे आहे.

- विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा बैठका सुरू
- माजी सभागृहनेते गणेश बिडकर निवडणूक प्रमुख
- केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे जिल्हा प्रभारीपद

शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्यासोबत युती झाली तर जागा वाटपाचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे 'स्वबळावरचा मार्ग' भाजपमध्ये अधिक लोकप्रिय होताना दिसतो.

- **अजित पवारांची राष्ट्रवादी: युतीसाठी आशावादी, दबावतंत्राचा वापर**

अजित पवार समूहाने शहरात पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. पूर्वेकडे सुनील टिंगरे, तर पश्चिमेकडे सुभाष जगताप यांची शहराध्यक्षपदी नियुक्ती करून संघटनात हालचाल वाढवली आहे.

भाजप स्वबळाकडे वाटचाल करत असल्याचे पाहत या गटाने राजकीय दडपण वाढवण्याचे तंत्र अवलंबले आहे. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षोबरोबर युतीचा पर्याय चाचपण्यात येत असून काही स्थानिक नेत्यांनी अनौपचारिक भेटीही घेतल्या. यामुळे राष्ट्रवादी (शरद पवार) गटात नाराजी उसळली; अगदी शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी तर राजकारणातून दूर होण्याचे संकेत दिले.

यावरून एक गोष्ट स्पष्ट - अजित पवार समूहाला आघाडीची तीव्र गरज आहे आणि त्यासाठी सर्व पर्याय खुले आहेत.

- **शिवसेना (शिंदे) : शांत, विस्कळीत आणि सवंगड्यांच्या शोधात**

शहरात शिवसेना (शिंदे) फारशी हालचाल करताना दिसत नाही. रवींद्र धंगेकर वगळता इतर स्थानिक नेते आक्रमक भूमिकेत नाहीत. पक्षाकडे फक्त एकच माजी नगरसेवक - नाना भानगिरे.

- पक्ष विस्तारासाठी इतर पक्षांतील नेत्यांना आणण्याचा प्रयत्न
- प्रत्येक प्रभागात सुशिक्षित आणि तरुण उमेदवार उभे करण्याची घोषणा
- परंतु संघटनात्मक बळ कमी म्हणूनच पक्षाची भूमिका 'थांबा आणि पाहा' अशीच.

- **काँग्रेस : संघटनातील गोंधळ, नेतृत्वशून्यता आणि सुस्ती**

महाविकास आघाडीतील काँग्रेसची अवस्था सर्वाधिक सुस्त दिसते. तीन वर्षांपेक्षा अधिक काळ शहराध्यक्ष कायमस्वरूपी नेमता आलेला नाही.

- दोन शहराध्यक्ष नेमण्याचा निर्णय पदाधिकाऱ्यांच्या नाराजीमुळे स्थगित
- गटबाजी उफाळून येत असल्याने संघटन कमकुवत
- शहरात कोणत्याही प्रकारची निवडणुकीची तयारी नाही
- एकेकाळी महापालिकेवर सत्ता असणाऱ्या काँग्रेसची स्थिती आज ढासळलेली आहे.

- **राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) : दोन मतप्रवाह, द्विधा मनस्थिती**

या पक्षात अजित पवारांच्या गटाशी आघाडी करायची की नाही, यावरून तीव्र मतभेद निर्माण झाले:

- शहराध्यक्ष प्रशांत जगताप मात्र ठाम विरोधात
- काही ज्येष्ठ नेत्यांना मात्र युतीतील गणित फायद्याचे वाटते
- महाविकास आघाडीतील इतर दोन पक्षांचा पुण्यात प्रभाव कमी
- या दोन मतप्रवाहांमुळे पक्षात विसंवाद आणि अनिश्चितता आहे.

- **शिवसेना (ठाकरे) : पारंपरिक मतांवर विसंबून अस्तित्वाची धडपड**

ठाकरे गटाची पुण्यात परंपरा असली तरी सक्षम स्थानिक नेतृत्वाचा अभाव जाणवतो. त्यामुळे अस्तित्व जपण्यासाठी पक्ष धडपडताना दिसतो.

- सचिन अहिर यांच्या उपस्थितीत गेल्या आठवड्यात आढावा बैठक
- मनसे आणि वंचित बहुजन आघाडीला बरोबर घेण्याच्या शक्यता
- स्वतंत्रपणे लढण्याची ताकद कमी

शिवसेना (ठाकरे) सध्या आघाडीसाठी उत्सुक तर आहे, पण प्रमुख भूमिका घेण्याइतकी मजबूत नाही.

- **मनसे : 'तळ्यात-मळ्यात', दिशाहीन आणि आदेशाच्या प्रतीक्षेत**

- मनसेमध्ये स्थिर निर्णय नाही.
- आघाडीत सहभागी व्हायचे की नाही याचा ठोस निर्णय नाही
- वर्षानुवर्षे त्याच व्यक्तींना पदे, कार्यकर्त्यांमध्ये नाराजी
- राज ठाकरे यांची तंबी - काम नसेल तर पद सोडा

मनसेची भूमिका निवडणुकीत निर्णायक ठरू शकते, पण सध्या पक्ष संभ्रमात आहे.





## ठळक बातम्या

### राजुरी येथील बिबट्या अखेर जेरबंद

**आळेफाटा (आरंभ पर्व) :** राजुरी येथिल आडेवहाळ मळा शिवारात वनविभागाने लावलेल्या पिजऱ्यात बुधवारी पहाटेच्या सुमारास अंदाजे चार ते पाच वर्षे वयाचा नर जातीचा बिबटया जेरबंद झाला. याबाबत मिळालेल्या माहीतीनुसार राजुरी( ता. जुन्नर) येथील आडेवहाळ मळ्यात दिवसेंदिवस बिबट्याचे दर्शन होत असल्याने या ठिकाणी असलेल्या बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाने पिंजरा लावावा अशी मागणी येथील ग्रामस्थांनी एकवन विभागाकडे मागणी केली होती. या मागणीनुसार या ठिकाणी असलेले नरेंद्र निवृत्ती गटकळ यांच्या शेतावर चार दिवसांपूर्वी पिंजरा लावण्यात आला होता व बुधवारी पहाटेच्या सुमारास पक्षाच्या शोधात असताना बिबट्या पिंजऱ्यात अडकला. वन अधिकारी विष्णू उचाळे यांनी ग्रामस्थांच्या मदतीने याश पकडलेल्या बिबटयाला माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात सोडले आहे. तसेच सदर बिबटया नर जातीचा असुन त्याचे वय अंदाजे पाच ते सहा वर्षे असल्याची माहिती दिली. दरम्यान आळे येथील वन कार्यालय अंतर्गत येणाऱ्या आळे ,राजुरी ,उंचखडक, कोळवाडी, संतवाडी, वडगाव आनंद या गावांमध्ये असणाऱ्या बिबट्यांना पकडण्यासाठी वीस ते बावीस पिंजरे लावलेले असून एका आठवड्यात तीन बिबटे जेरबद करण्यात वन विभागाला यश आलेले आहे.



# खडकवासला धरणाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

## चौपाटी कारवाईत व्यस्त पाटबंधारे विभागाचे धरणाच्या भिंतीकडेच दुर्लक्ष?



पै. राहुल मते यांचा आंदोलन करण्याचा इशारा

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या जलजीवनाचा आधारस्तंभ असलेल्या खडकवासला धरणाच्या भिंतीची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. मध्यंतरी चौपाटीवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी पाटबंधारे विभागाने मोठी कारवाई केली होती; पण धरणाच्या मूलभूत सुरक्षिततेकडेच झालेलं दुर्लक्ष आता समोर पडायला लागलं आहे.

धरण परिसरातून मिळालेल्या छायाचित्रांमध्ये धरणाच्या विशाल भिंतीवर ठिकठिकाणी उगवलेली झाडे, जमिनीत खोलवर गेलेली मुळे, ओलसरपणाच्या खुणा आणि ढासळणारे दगडी बांधकाम! दगडी धरणाच्या भिंतीत अशा प्रमाणात वाढलेली झाडे ही धरणाच्या सुरक्षिततेला थेट धोका असल्याचे तज्ज्ञ वारंवार सांगत आलेत. मात्र प्रत्यक्ष अनुपालनात पाटबंधारे विभाग ठोस पावलं उचलताना दिसत नाही.

याचबरोबर धरणाजवळील पाणीवाहिनी आणि पाइपलाइन भागातही परिस्थिती तितकीच गंभीर आहे. गंजलेल्या पाइप्स, अनियमितरीत्या ढकललेल्या इलेक्ट्रिक केबल्स, आणि पाईपलाइनभोवताल वाढलेली झुडपे या सगळ्यावरून येथे देखभालच होत नसल्याचं स्पष्ट दिसतं. धरण परिसरात अशी बेफिकीरी म्हणजे थेट चुकते पाणी, मोठा धोका. आहे.

या सगळ्या गंभीर परिस्थितीवर सामाजिक कार्यकर्ते पै. राहुल मुरलीधर मते यांनी प्रशासनाला थेट सवाल उपस्थित केला आहे.

"पाटबंधारे विभागाचे मुख्य काम धरण सुरक्षित ठेवणे... चौपाटीवर कारवाई करणे नव्हे! धरणाच्या भिंतीवर झाडे उगवतात, मुळे भिंत फोडतात, गळतीच्या खुणा दिसतात... आणि विभाग मात्र अतिक्रमण कारवाईत व्यस्त! धरण सुरक्षा प्राथमिक नाही का?" असा त्यांच्या भाषेत तीव्र रोष आहे.

पै. मते पुढे म्हणाले; "लाखो नागरिकांचा जीव धरणावर अवलंबून आहे. डॅम सुरक्षित आहे की नाही याची नियमित तपासणी व दुरुस्ती ही प्राथमिक जबाबदारी आहे. पण प्रत्यक्ष पाहिल्यावर धरण डागडुजीचा मागमूसही नाही. अशा बेफिकिरीमुळे मोठा अपघात झाला तर जबाबदार कोण तात्काळ कार्यवाही करून ठोस निर्णय घ्यावा अन्यथा आंदोलन करावे लागेल?"

नागरिकांमध्येही आता नाराजीचा सुर वाढलेला दिसतो. पाटबंधारे विभागाची प्राधान्यक्रमाची गफलत आणि धरण सुरक्षिततेकडे होणारे दुर्लक्ष हे सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर प्रश्न बनत आहे.

**धरण सुरक्षिततेचा प्रश्न हा कुठलाही राजकारणाचा विषय नसून, लाखो जीवांची हमी आहे. यापुढेही धरणाची अवस्था अशीच राहिली तर मोठा अनर्थ ओढवू शकतो, अशी शक्यता व्यक्त होत आहे. याबाबत पाटबंधारे विभाग काही कार्यवाही करते का याकडे सगळ्यांचे लक्ष असणार आहे.**



## महिला आघाडीच्या शहर सरचिटणीस पदी सायली पवार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या पुणे शहर महिला आघाडीच्या शहर सरचिटणीस पदी सायली विजय पवार यांची नियुक्ती शहराध्यक्ष हिमाली कांबळे यांच्या हस्ते करण्यात आली. सायली पवार यांना त्यांच्या नियुक्तीचे पत्र पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे, प्रभारी शैलेंद्र चव्हाण, बाळासाहेब जानराव, परशुराम वाडेकर, असित गांगुर्डे, अशोक कांबळे , महेंद्र कांबळे, महिपाल वाघमारे, श्याम सदाफुले इत्यादी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



सायली पवार या गेल्या दहा वर्षापासून सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत. शहरातील विविध झोपडपट्ट्यांमध्ये नागरी सुविधांचे प्रश्न, शालेय साहित्य वाटप, महिला बचत गट, तरुणांना रोजगार मिळवून देणे अशा विविध कार्य त्यांनी केले आहे. त्या पदवीधर असून महिलांना सक्षम करण्यासाठी त्यांचे मोठे योगदान आहे त्यांच्या निवडीमुळे शिवाजीनगर मतदार संघामध्ये उत्साहाचे वातावरण आहे रिपब्लिकन पक्षाच्या वाढीसाठी त्यांचा निश्चित उपयोग होईल असा विश्वास पुणे शहर महिला अध्यक्ष हिमाली कांबळे यांनी व्यक्त केला.

## छत्रपती शिवरायांचा पराक्रम अनुभवता येणार

### शिवनेरीसह चार किल्ल्यांवर 'नमो पर्यटन माहिती केंद्र' उभारणीला वेग



**सिंहगड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील पर्यटनाला नवसंजीवनी देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ऐतिहासिक किल्ल्यांवर 'नमो पर्यटन माहिती सुविधा केंद्र' उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. पहिल्या टप्प्यात शिवनेरी, प्रतापगड, रायगड आणि साल्हेर या चार किल्ल्यांची निवड करण्यात आली असून, या प्रकल्पासाठी तब्बल ५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

पर्यटन विभागाचे संचालक भगवंतराव एन. पाटील यांनी सांगितले की, शिवनेरी व प्रतापगड किल्ल्यांसाठी निविदा प्रक्रिया सुरू झाली असून, रायगड व साल्हेरसाठी पुढील दोन दिवसांत निविदा जाहीर केल्या जाणार आहेत. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यातील पर्यटन व्यवस्थेला मोठी गती मिळणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी राज्यभर ७५ नमो पर्यटन माहिती केंद्रे उभारण्याची घोषणा केली होती. ही केंद्रे पूर्णपणे पर्यटन सहाय्य केंद्र म्हणून कार्यरत राहतील. किल्ल्यांपर्यंत पोहोचण्याचे मार्ग, आवश्यक सुविधा, माहितीफलक, मार्गदर्शक व्यवस्था, स्वच्छता व आपत्कालीन सेवा यांचे नियोजन या केंद्रांद्वारे केले जाणार आहे.

या केंद्रांमध्ये ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमातून किल्ल्यांचा इतिहास, युद्धकाळातील रणनीती, लढाया आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम अत्याधुनिक पद्धतीने अनुभवता येणार आहे.

नव्या पिढीपर्यंत मराठ्यांच्या शौर्यकथा, गौरवशाली परंपरा आणि किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व प्रभावीरीत्या पोहोचवण्यास ही केंद्रे महत्त्वाची ठरणार आहेत.

तसेच पर्यटकांना आरामदायी व सुरक्षित पद्धतीने किल्ल्यांपर्यंत पोहोचता यावे, यासाठी मार्गदर्शन केंद्रे, प्राथमिक उपचार सुविधा, माहितीफलक, स्वच्छता व्यवस्था आणि प्रशिक्षित मार्गदर्शकांची उपलब्धता सुनिश्चित केली जाणार आहे.

### स्थानिकांसाठी रोजगाराची संधी

**या केंद्रांच्या कार्यान्वयनात स्थानिक ग्रामस्थ व स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग राहणार असून त्यातून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. ग्रामीण पर्यटनालाही याचा मोठा लाभ होणार आहे. शिवनेरी, प्रतापगड, रायगड आणि साल्हेर या चार प्रमुख किल्ल्यांवर केंद्रे उभारल्यामुळे राज्यातील पर्यटनाचा दर्जा उंचावेल, तसेच छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाचा इतिहास पर्यटकांना प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळणार आहे.**

## वारजे रामनगरमध्ये शॉर्टसर्किटची भीषण आग

- **दोन घरांचा संपूर्ण संसार राख... चार दिवसानंतरही मदत नाही**

**वारजे, पुणे-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**



वारजे-माळवाडी येथील रामनगर या शहरातील सर्वात मोठ्या लोकवस्तीत तीन दिवसांपूर्वी शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत दोन घरे पूर्णपणे जळून खाक झाली. शेजारील नागरिकांनी धाव घेऊन मदत करत आग विझवण्याचा प्रयत्न केला. तत्परतेने दाखल झालेल्या अग्निशमन दलाच्या तीन गाड्यांनी आग आटोक्यात आणली, मात्र तोपर्यंत घरातील सर्व साहित्य पूर्ण जळून गेले होते.

सुदैवाने अग्निशमन कर्मचारी व स्थानिकांची सतर्कता यामुळे मोठी जीवितहानी टळली. मात्र रामनगर सारख्या घनदाट लोकवस्तीत पाणी, वीज, अंतर्गत रस्ते, स्वच्छता व सुरक्षेच्या मूलभूत सुविधा अद्याप दुर्लक्षित असल्याची टीका नागरिकांनी केली आहे.

दुर्घटनेला चार दिवस झाले तरी महानगरपालिका, प्रशासन किंवा शासनाकडून घटनेतील भैरवनाथ भालशंकर व अविनाश भालशंकर या पीडित कुटुंबांना कोणतीही मदत मिळालेली नाही, असा आरोप स्थानिकांनी केला. या संदर्भात वारजे क्षेत्रीय कार्यालयाच्या सहायक आयुक्त अस्मिता तांबे यांना निवेदन देण्यात आले असून,

"शासनाने तातडीने मदत न केल्यास आम्हाला आयुक्तांच्या केबिनमध्ये संसार मांडावा लागेल," असा इशारा देण्यात आला आहे. निवेदन देताना आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते अरविंद शिंदे, रियाज शेख, प्रमोद राऊत, सुदाम शेंडगे, अमोल काळे, प्रविण सोनवणे, सुरेश गायकवाड उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी अशा दुर्घटना टाळण्यासाठी रामनगर लोकवस्तीतील मूलभूत सुविधांकडे तातडीने लक्ष द्यावे, खडकवासला विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे सामाजिक न्याय विभागाचे अध्यक हनुमंत शिवूर अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.



## पुढील पिढीच्या सप्लाय चेन ट्रेंड्सची झलक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आंतरराष्ट्रीय स्कूल ऑफ बिझनेस अँन्ड मीडिया (ISB&M), पुणे येथे विद्यार्थी-चालित स्कोप क्लब (सप्लाय चेन आणि ऑपरेशन्स विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ) यांच्या वतीने संस्थेचे संस्थापक–अध्यक्ष डॉ. प्रमोद कुमार आणि लॉजिस्टिक व सप्लाय चेन ऑपरेशन मॅनेजमेंट विभाग प्रमुख व फॅकल्टी कोऑर्डिनेटर श्री. नविन वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली चेन अक्ट 2025 (Chain Act 2025) हे दोन दिवसीय प्रमुख आयोजन 28 व 29 नोव्हेंबर रोजी पार पडले. स्मार्ट सप्लाय चेन ("SMART Supply Chain") या विषयावर आधारित या कार्यक्रमात जागतिक सप्लाय चेन व ऑपरेशन्स क्षेत्रातील अग्रणी तज्ज्ञ, प्राध्यापक आणि उद्योजक विद्यार्थी एकत्र येऊन तंत्रज्ञान, शाश्वतता, डेटा इंटेलिजन्स आणि मानवी कौशल्य या माध्यमातून सप्लाय चेनच्या भविष्यात होणाऱ्या बदलांवर चर्चा केली. चर्चेदरम्यान सप्लाय चेनची वाढती धोरणात्मक भूमिका, सक्षम व लोचशील बिझनेस इकोसिस्टम घडविण्यातील त्याचे महत्त्व आणि भविष्यातील नेत्यांनी तंत्रज्ञान, सहकार्य आणि चपळता आत्मसात करण्याची गरज अधोरेखित झाली.

## 'आदर संविधानाचा जागर' कीर्तन सोहळा उत्साहात संपन्न

- **अध्यात्म, धर्म आणि संविधान मूल्यांचा सुंदर संगम कीर्तनातून उलगडला**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संविधान दिनाचे औचित्य साधत रविवारी सिद्धार्थ नगर, बावधन बुद्रुक येथे 'आदर संविधानाचा जागर' कीर्तन सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. विकास प्रतिष्ठान, सुजता महिला मंडळाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला ग्रामस्थांसह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने आणि भारतीय संविधानाच्या प्रतीचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर सामूहिकरीत्या संविधानाची प्रास्ताविका वाचन करून लोकशाही मूल्यांप्रती दृढ निष्ठा व्यक्त करण्यात आली. विकास प्रतिष्ठानचे संस्थापक आणि रिपब्लिकन पक्ष, महाराष्ट्र प्रदेश युक्क आघाडीचे संघटक उमेश कांबळे यांनी स्वागतपर भाषणात सामाजिक कार्याची दिशा मांडली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण मोहीम, तसेच महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथीचे आयोजन हे उपक्रम ग्रामस्थांच्या सहकार्यातून यशस्वी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात विविध मान्यवरांनी संविधानाच्या अस्मितेवर, जागर संस्कृतीवर तसेच नागरिकांच्या कर्तव्यांवर मनोगत व्यक्त केले. यामध्ये शिक्षणसम्राट राजेंद्र बांदल, पोलीस पाटील बबनराव दगडे, माजी नगरसेवक दिलीप अण्णा वेडे पाटील, रिपब्लिकन पक्षाचे संघटन सचिव परशुराम वाडेकर आणि मा. सभागृह नेते पुणे मनपा बंडू केमसे यांचा समावेश होता.

सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांतर्गत नामदेवराव मोरे माध्यमिक विद्यालय, बावधन येथील २०० विद्यार्थ्यांना विकास प्रतिष्ठानतर्फे शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यानिमित्त उपस्थित मान्यवरांचा शाल, संविधानाची प्रत आणि 'संविधान ट्रॉफी' देऊन सत्कार करण्यात आला. राजेंद्र बांदल, परशुराम वाडेकर, भरत मारणे, विजय दगडे पाटील, किरण दगडे पाटील, निखिल बांदल,कुटुंबीय यांसह, महाराष्ट्र शासन कीर्तन पुरस्कारप्राप्त राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचा विशेष गौरव करण्यात आला. महाराजांनी संविधान विषयावरील प्रभावी कीर्तन सादर करून उपस्थितांचे मनोवेधन केले.

कार्यक्रमास बबनराव दगडे पाटील, सुदामराव मुंडे, राजू मुंडे, राहुल दुधाळे, शैलेंद्र चव्हाण, संगीता आठवले, वैशाली कांबळे, पियुषा दगडे पाटील, दीपक दगडे, गणेश दगडे पाटील, सूर्यकांत मुंडे, स्वराज कांबळे, यशराज, कांबळे, प्रविण ओहळ, विशाल शेलार, विशाल शेळके, अविनाश कांबळे, प्रदीप कांबळे, निलेश कांबळे, बाळकृष्ण कांबळे, तसेच बावधन परिसरातील अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युवा नेते अभिजित दगडे पाटील, बजरंग दल पश्चिम महाराष्ट्रचे अध्यक्ष नितीन महाजन, शिवसेना नेते दत्ताभाऊ दगडे पाटील आणि संदीप वेडे पाटील यांचाही 'संविधान प्रत' देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वीकृत नगरसेवक वैभव मुरकुटे, शीलाताई पठाण आणि दीपक मस्के यांनी उत्कृष्टपणे पार पाडले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सह्याद्री कॉम्पिटिटिव्ह अकॅडमीकडून अभ्यासक्रम पुस्तकांचे अनावरण

**सावर्डे (आरंभ पर्व) : सह्याद्री शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत सह्याद्री कॉम्पिटिटिव्ह अकॅडमी मार्फत पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेची पूर्वतयारी इयत्ता चौथी व सातवी मध्ये करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या इंग्रजी व मराठी माध्यमाच्या मार्गदर्शक अभ्यासक्रम पुस्तकांचे अनावरण आमदार शेखर निकम यांच्या हस्ते संपन्न झाले. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती मिळावी, तयारीचा आत्मविश्वास वाढावा आणि स्पर्धेत टिकून राहण्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या शैक्षणिक प्रवाहानुसार शिक्षक वर्ग सतत अपडेट राहणे आणि पालकांमध्ये स्पर्धा परीक्षेबाबत जागरूकता निर्माण होणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.**

### फाईल थांबली तर संबंधित अधिकाऱ्याची सर्व्हिस थांबली-तरच बदल होईल!

**सिंहगड-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : शहरांच्या वाढत्या विस्ताराने महाराष्ट्राचे राजकारण, प्रशासन आणि संसाधनांचे प्राधान्यक्रम पूर्णपणे बदलत आहेत. एकेकाळी राज्याच्या अजेंड्यावर ठामपणे असलेले ग्रामीण प्रश्न - शेतकरी आत्महत्या, पाणीटंचाई, ग्रामीण रस्ते, शाळा-दवाखाने - आज शहरीकरणाच्या कोलाहलात मागे पडत चालले आहेत. १९६२ मध्ये फक्त २२ टक्के लोक शहरात राहत होते, आज ते प्रमाण ५५ टक्क्यांच्या पुढे गेले आहे. त्यामुळे नगरपालिका, नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांचा प्रभाव आणि दबाव वाढला आहे. शहरांची लोकसंख्या वाढली की राजकारणही शहरांकडे झुकते, माध्यमांचाही फोकस शहरांवर जातो, आणि त्यामुळे ग्रामीण वास्तव अधिकच धूसर होत चालले आहे. मात्र या शहरीकरणाच्या गोंगाटात आणखी एक मोठी समस्या भीषण आकार घेत आहे - प्रशासनातील टाळाटाळ आणि निष्क्रियता. फाईल ८–८ महिने पडून राहते, संबंधित अधिकाऱ्यांकडून "उद्या या... परवा या..." असा उडवा-उडवीचा खेळ सुरू असतो, आणि सामान्य माणूस भरडला जातो. यावर समाजात एकच मागणी जोर धरत आहे- "फाईल जर थांबली, तर त्या अधिकाऱ्याची सर्व्हिस थांबली पाहिजे; तेव्हाच व्यवस्था बदलणार!" आज शहरीकरण हे वास्तव आहे, पण त्याच्या नावाखाली ग्रामीण प्रश्न हरवू नयेत, आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे- सामान्य नागरिकाच्या फाईलला न्याय मिळण्यासाठी पूर्ण व्यवस्था जबाबदार धरली जावी. नागरिक वापसले की लोकशाही कमकुवत होते; पण अधिकारी जबाबदार धरले की प्रणाली मजबूत होते.**

### भोर नगरपालिका निवडणुकीत ७६.९९% मतदान

- **शिस्तीत मतदानांची सांगता, मात्र आजी-माजी आमदारांच्या कार्यकर्त्यांमध्ये तणाव**

**भोर (आरंभ पर्व) : भोर नगरपालिका निवडणुकीत नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल 76.99% मतदानाची नोंद केली. एकूण 16,716 मतदारांपैकी 12,870 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर महिलांची, तरुणांची तसेच ज्येष्ठ मतदारांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडत असताना, दुपारी शहरातील एका मतदान केंद्राजवळ आजी आमदार शंकर मांडेकर व माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार वाद झाला. काही मिनिटे वातावरण तणावपूर्ण बनले होते. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. संभाव्य गोंधळ रोखण्यासाठी शहरातील काही ठिकाणी पोलिस बंदोबस्त अधिक कडक करण्यात आला होता. मतदानाची सांगता शांततेत झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष 21 डिसेंबरला होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे. उच्च मतदानामुळे प्रभागांमध्ये तीव्र चुरस निर्माण झाली असून, काही ठिकाणी अनपेक्षित उलटफेर होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. दरम्यान, मतदान संपताच विविध राजकीय पक्षांनी आपल्या विजयाचे दावे जोरदारपणे मांडले आहेत. नागरिकांनी दाखवलेला उत्साह हा लोकशाहीवरील त्यांच्या दृढ विश्वासाचा उत्कृष्ट नमुना असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्यांकडून मिळत आहे.**

### दि डेटा टेक लॅब्स प्रकारांतील तक्रारदाराचा गैरसमज दूर

THE DataTech LABS

**पुणे (आरंभ पर्व) : दि डेटा टेक लॅब्स इनकॉर्पोरेशन (The DataTech Labs / Dnyanasha Technology Solutions Pvt. Ltd.) चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित ज्ञानेश्वर आंद्रे यांच्याविरुद्ध करण्यात आलेले फसवणुकीचे, धमकीचे आणि बदनामीकारक आरोप पूर्णपणे तथ्यहीन आणि गैरसमजातून झालेले असल्याचे स्पष्ट झाले आहे. तक्रारदाराने स्वतः पूरक जबाब देऊन सर्व आरोप मागे घेतले असून ते आरोप नैराश्य, आर्थिक ताण आणि भ्रम निर्माण झाल्यामुळे केल्याचे नमूद केले आहे. तक्रारदाराने पोलिसांना लेखी स्वरूपात विनंती करून हे प्रकरण बंद करण्याची मागणी केली आहे. डॉ. अमित आंद्रे यांनी 24 नोव्हेंबर 2025 रोजी बावधन पोलिस ठाण्यात अधिकृत निवेदनासोबत सर्व संबंधित कागदपत्रे सादर केली. कंपनीची भारत, अमेरिका, ब्रिटन, यूएई आणि मलेशिया येथील नोंदणी प्रमाणपत्रे, उमेदवारांसोबत झालेल्या सर्व ईमेल नोंदी, प्रशिक्षण शुल्काशी संबंधित बँक रेकॉर्ड, व्यवहारांची माहिती, तसेच याच्याशी संबंधित आर्थिक पुरावे पोलिसांना उपलब्ध करून दिले. या सर्व दस्तऐवजांचा तपास केल्यानंतर आरोपांना कोणताही कायदेशीर किंवा तथ्यात्मक आधार नसल्याचे निष्पन्न झाले. तक्रारदाराने केलेला आर्थिक फसवणुकीचा आरोपही निराधार असल्याचे स्पष्ट झाले आहे. कंपनी बहुराष्ट्रीय असल्याचा केलेला खोटा दावा, कोणतेही कारण न देता सेवा समाप्त केल्याचा आरोप आणि उमेदवारांना धमकी दिल्याचे म्हणणे हे सर्व निष्पन्न झालेल्या पुराव्यांशी विसंगत असल्याचे आढळले. डॉ. आंद्रे यांनी कोणत्याही तक्रारदाराशी प्रत्यक्ष भेट घेतलेली नसून, सर्व संवाद अधिकृत ईमेलच्या माध्यमातूनच झाल्याचेही सिद्ध झाले. तपासादरम्यान तक्रारदाराने स्वतःच आपले आरोप मागे घेतले असून गैरसमज झाल्याचे मान्य केले आहे. डॉ. आंद्रेंनी आपल्या लेखी निवेदनात कंपनी नेहमीच पारदर्शक, कायदेशीर आणि नैतिक पद्धतीने काम करत असल्याचे नमूद केले आहे. सर्व पुरावे, दस्तऐवज आणि तक्रारदाराची कबुली यांची एकत्रित छाननी केल्यानंतर हे प्रकरण पूर्णपणे निराधार असल्याचे स्पष्ट झाले असून, पोलिसांकडे या तक्रारीत पुढील कोणतीही कार्यवाही शिल्लक नसल्याचे समजते.**







# प्रभाग ३३ मध्ये अटीतटीची लढत; 'श्रावणबाळ' कोण ठरणार?

- **देवदर्शन की महाआरोग्य शिबीर – मतदारांच्या मनात उत्सुकता**

**विशाल भालेराव**
**(दै. आरंभ पर्व)**



खडकवासला- महापालिका निवडणुकीचे वारे जोर धरू लागल्याने प्रभाग क्रमांक ३३ मध्ये जनसंपर्काची शिगाटी चढली आहे. इच्छुक उमेदवारांकडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध उपक्रमांची रेलचेल सुरू असून, देवदर्शन मोहीम, भजन साहित्य वाटप, महिलांसाठी विविध कार्यक्रम, भजन स्पर्धा ते महाआरोग्य,मोफत आरोग्यविमा शिबिरापर्यंत अनेक उपक्रमांतून आपापला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न जोरात सुरू आहे.

या सर्व स्पर्धेत एकच प्रश्न उपस्थित होत आहे — "या प्रभागाचा 'श्रावणबाळ' कोण ठरणार?"

**देवदर्शन मोहिमांची लगबग :** बहुतांश इच्छुक उमेदवारांनी विविध देवस्थानांच्या दर्शन यात्रांवर भर दिला आहे. काही उमेदवारांच्या वतीने रेल्वे ट्रिप तर काहींच्या वतीने लक्झरी बसद्वारे मोठ्या प्रमाणावर भाविकांना देवदर्शनासाठी पाठविण्याची मोहीम राबविली जात आहे.

— आयोध्या, काशी विश्वेश्वर, ओंकारेश्वर, महाकालेश्वर

या देवदर्शनांमध्ये मतदार मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

याशिवाय, "ज्यांना ज्या देवाला जायचे त्यांना तेथे देवदर्शनाची सोय करून देऊ", अशी हमी देत काही उमेदवारांनी दोन-दोन पर्यायही उपलब्ध केले आहेत.

**महाआरोग्य शिबिरांचे राजकारण**

याउलट एका प्रमुख इच्छुक उमेदवाराने महाआरोग्य शिबिरांवर भर दिला असून, विविध आजारांची तपासणी, मोफत औषधोपचार, विमा कवच अशा सुविधा देत जनसंपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**मतदारांमध्ये चर्चा : "श्रावणबाळ कोण?"**

देवदर्शन मोहिमा की आरोग्य शिबिरे — लोकाभिमुखतेची ही दोन्ही मॉडेल्स मतदारांच्या मनात संभ्रम निर्माण करत आहेत. "श्रावणबाळ" सारखा जनहिताचा विचार कोण करतो, आणि जनतेशी जवळीक साधण्यात कोण यशस्वी ठरतो, याची उत्सुकता नागरिकांमध्ये वाढली आहे.

## निवडणूक जाहीरतीची प्रतीक्षा

**निवडणूक तारखा अद्याप जाहीर न झाल्या तरी प्रभाग ३३ मधील वातावरण तापू लागले आहे. जनसंपर्क, देवदर्शन, आरोग्य शिबिरे आणि मोफत सुविधा — या चौकटीतून कोण मतदारांच्या मनात घर करून विजयी ठरणार, हे येणारा काळच ठरवेल.**

# एआय आधारित दिवाळी अंकाला दाद



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ आयोजित सोहळ्यात हार्ट पब्लिकेशनच्या दिवाळी अंकाला उत्कृष्ट दिवाळी अंक या विभागात उत्तेजनार्थ पारितोषिक जाहीर करण्यात आले. सुप्रसिद्ध अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक मा. योगेश सोमन यांच्या उपस्थितीत तसेच मा. भारत सासणे यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान झाला. या कार्यक्रमाला मा. अशोक मुळे, मा. एल. एम. कडू, राजीव बर्वे, पराग लोणकर यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. या अभिमानाच्या क्षणी प्रकाशनाच्या टीममधील धोंडप्पा नांदे हेही उपस्थित होते. हार्ट पब्लिकेशनचे प्रकाशक विनोद शिंदे यांनी सांगितले की, हा अंक त्यांच्या टीमसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. २०२४ मधील सर्व महत्त्वाच्या राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये या अंकाने आपली छाप सोडली. हा जगातील पहिला मराठी एआय निर्मित दिवाळी अंक असल्याची दखल विविध समित्यांनी घेतली. सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धेत या अंकाला वेगवेगळ्या पारितोषिकांनी गौरविण्यात आले.

# राष्ट्रनिर्मितीसाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाची गरज : प्रा. मनीष मुंदडा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"डिझाईन थिंकिंग, उद्योजकता आणि इकोसिस्टिम्सद्वारे औद्योगिक नवकल्पनांना चालना" या विषयावर आधारित एआयसीटीई–अटल प्रायोजित सहा दिवसीय ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन साईबालाजी इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सेस पुणे येथे २४ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर मध्ये करण्यात आले होते.



या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि साईबालाजी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनीष आर. मुंदडा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्वांगीण राष्ट्रनिर्मितीसाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण उपक्रमांची नितांत गरज असल्याचे अधोरेखित केले. विविध क्षेत्रातील प्राध्यापकांच्या अद्ययावत ज्ञानवृद्धीसाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, एआयसीटीईच्या देशभरातील कौशल्यविकास उपक्रमांचे कौतुक करताना अटल उपक्रमांतर्गत आयोजित हजारो एफडीपींच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात होत असलेल्या सकारात्मक बदलांबद्दल त्यांनी माननीय पंतप्रधानांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची प्रशंसा केली.

यावेळी साईबालाजी एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापक सचिव प्रा. निरुपमा मुंदडा यांचा कार्यक्रमात आभासी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या स्वागतपर भाषणात डॉ. अनामिका सिंग, संचालक,एसबीआयआयएमएस ,यांनी सर्व मान्यवर, तज्ज्ञ व सहभागींचे मनःपूर्वक स्वागत केले. या एफडीपीच्या संकल्पनेपासून त्याच्या यशस्वी अंमलबजावणीपर्यंत सातत्यपूर्ण मार्गदर्शन व पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी संस्थेचे अध्यक्ष प्रा. मनीष मुंदडा यांचे विशेष आभार मानले. प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी साईबालाजी एज्युकेशन सोसायटी सातत्याने उपक्रम राबवत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यानंतर मान्यवर पाहुणे डॉ. देविदास गोल्हार, संचालक, इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन लिंककेजेस, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी उच्च शिक्षण संस्थांमधील नवकल्पनांचे वाढते महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण विचारसरणी विकसित करण्यासाठी प्राध्यापकांनी प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

समारंभाची सुरुवात सरस्वती वंदना आणि दीपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. ऋषिकेश काकांडीकर यांनी या एफडीपीसाठी देशातील 20 राज्यांमधून विविध क्षेत्रांतील 400 पेक्षा अधिक प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला असल्याची माहिती दिली.

# नरेंद्र पारखे : मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**आंबेगाव खुर्द (दै. आरंभ पर्व)**



पारखे कॉर्नर, हनुमान नगर, आंबेगाव खुर्द येथे नरेंद्र पारखे यांच्या पुढाकारातून देशसेवा फाउंडेशन आणि सेवा भारती कात्रज भाग यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरास स्थानिक महिलांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. सुपोषित भारत अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या या शिबिरात हिमोग्राम (CBC), रक्तदाब तपासणी तसेच आवश्यकतेनुसार डॉक्टरांकडून आहार मार्गदर्शन करण्यात आले.

आजच्या कार्यक्रमाला सेवाभारती कात्रज भागाचे सचिव श्री. सुधीरजी ओक, तसेच कार्यकारिणी सदस्य डॉ. नीता देशपांडे, वैभव घोणे, अंबादास वैद्य उपस्थित होते. तसेच रा. स्व. संघ आंबेगाव नगर सहकार्यवाह अक्षयजी खळदकर यांनीही शिबिराला भेट देऊन कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. शिबिरासाठी आरोग्य तपासणीची जबाबदारी वेंकटेश डायग्नोस्टिकतर्फे श्री. व सौ. महंतेश नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी पार पाडली.

रक्त तपासणी, बीपी तपासणी आणि प्राथमिक आरोग्य सल्ल्यासाठी महिलांची मोठी गर्दी पहायला मिळाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.




# नवले ब्रिज दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर तात्काळ पाच उपाययोजना कराव्यात


## उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबई–बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील नवले ब्रिज परिसरात वारंवार होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयात तातडीची आढावा बैठक घेतली.

सदर महामार्गावरील वाहतूक सुरक्षिततेसाठी, नवा रिंगरोड प्रकल्प पूर्ण होईपर्यंत प्रशासकीय यंत्रणेनं तत्काळ राबवावयाच्या पाच महत्त्वपूर्ण उपाययोजना घोषीत कराव्यात, अशा ठोस सूचना त्यांनी बैठकीत केल्या.

या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागीय उपायुक्त तुषार ठोंबरे, पुणे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी संजय कदम, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांचे वरिष्ठ अभियंते, वाहतूक पोलीस, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बैठकीत नवले ब्रिज परिसरातील अपघातांच्या पुनरावृत्तीची कारणमीमांसा, वाहतूक कोंडी, ट्रक व भारी वाहनांची अनियंत्रित गती, घाट आणि उतारातील वाहन नियंत्रण यावर सविस्तर चर्चा झाली. अनेक अपघातांमध्ये वाहनांच्या वेगावरील अपुऱ्या नियंत्रणामुळे मोठी जीवितहानी झाल्याचे लक्षात घेऊन उपसभापतींनी पुढील उपाययोजनांचा अवलंब करण्याचे आदेश दिले.

यामध्ये सर्वप्रथम, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा आधार घेत स्पीड कमी करण्यासाठी सुसंगत रबर स्पीड ब्रेकर किंवा रंबल स्ट्रिप्स बसवण्यावर भर देण्यात आला. रस्ता ओला असताना वाहनांच्या घसरण्याचे प्रमाण वाढते, त्यामुळे हे स्ट्रिप्स संपूर्ण सुरक्षा मानकांनुसार बसवावेत, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली.

दुसरे म्हणजे, वाहतूक कोंडी निर्माण झाल्यानंतर तातडीने परिस्थिती हाताळण्यासाठी Action Oriented Plan (AOP) तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. रात्री वा पावसाळ्यात अपघात झाल्यास कोंडी वाढू न देता वाहन प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी पोलिस, महामार्ग प्राधिकरण आणि मनपांच्या पथकांमध्ये समन्वय वाढवण्याची गरजही बैठकीत व्यक्त झाली.

तिसरे म्हणजे, अपघातप्रवण झोनमध्ये मोबाइल चेकपोस्ट किंवा स्थिर चौकीची स्थापना करता येईल का याबाबत नियमांनुसार तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः भारी वाहनांचे वेग नियंत्रण, ब्रेक कंडीशन, ओव्हरलोडिंग यावर नजर ठेवण्यासाठी हे केंद्र प्रभावी ठरतील, असे उपसभापतींनी सांगितले.

चौथ्या उपाययोजनेत अपघातप्रवण परिसरात ध्वनीक्षेपक (Public Address System) बसवून चालकांना सतत वेग, उतार, पावसाळी परिस्थिती आणि ट्रॅफिक अद्यतनांची माहिती देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. हे सिस्टम महामार्ग पोलिसांच्या नियंत्रणात राहून त्वरित सूचना देऊ शकतील.

पाचव्या उपाययोजनेत जवळच फायर ब्रिगेडची सुविधा उपलब्ध ठेवणे, रेस्क्यू टीम तैनात करणे, तसेच अपघातानंतर 'गोल्डन अवर' मध्ये मदत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र पथक तयार करण्याचे निर्देश दिले.

याशिवाय ट्रक मालक असोसिएशनची बैठक घेऊन ड्रायव्हर ट्रेनिंग, उतारावरील गतीनियंत्रण, वाहनांची नियमित तपासणी अशा मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यासही सांगितले. बैठकीदरम्यान उपसभापतींनी प्रशासनाला सांगितले की, नवले ब्रिज परिसरातील अपघातांची मालिका थांबवण्यासाठी जबाबदारी निश्चित करून एक आदर्श नमुना तयार करावा. प्रशासनाने या सर्व उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, येत्या 26 किंवा 27 डिसेंबर रोजी आपण या संदर्भात आढावा घेणार असल्याचे त्यापूर्वी याबाबीवरचा कार्य अहवाल ठेवावा असे निर्देश दिले.




## थोडक्यात पण महत्वाचे

### दिवसा ढवळ्या घरफोडी, तर पहाटे अनेक फ्लॅट्स फोडून मोठी चोरी



**खडकवासला-विशाल भालेराव (आरंभ पर्व) : परिसरात घरफोड्यांची मालिका सुरू झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. खडकवासला गावात दिवसा ढवळ्या एका घरात चोरी झाली, तर पहाटे 3 ते 4 वाजता 350 फ्लॅट्स असलेल्या होमडेल सोसायटीतील अनेक फ्लॅट्स चोरट्यांनी फोडल्याची मोठी घटना उघडकीस आली आहे.या चोरीत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, दागदागिने, इलेक्ट्रॉनिक वस्तू व इतर मौल्यवान साहित्याचा समावेश असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. सलग अनेक फ्लॅट्स फोडून चोरट्यांनी सोसायटीतील सुरक्षेला चकवा दिल्याने रहिवाशांमध्ये संतापाचे वातावरण आहे. स्थानिक रहिवाशांनी काही दिवसांपासून परिसरात संशयित परप्रांतीय तरुणांची वर्दळ वाढल्याचा उल्लेख केला असून त्याच पार्श्वभूमीवर ही घरफोडी झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, हवेली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे काम सुरू केले आहे. सोसायटीमध्ये अतिरिक्त सुरक्षा, गस्त आणि प्रवेश-नियंत्रण वाढविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पोलिसांनी नागरिकांना घराची सुरक्षा मजबूत करण्याचे, सीसीटीव्ही कार्यरत ठेवण्याचे आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसताच तात्काळ पोलिसांना कळविण्याचे आवाहन केले आहे.**

### लोकवर्गणीतून होत आहे अहीरे गावचा रस्ता; दहशत संपवून निर्णायक पवित्रा

**अहीरे (आरंभ पर्व) : अहीरे (ता. हवेली) : वर्षानुवर्षे रखडलेला भूकूम ते वांजळेवाडी- वाघवाडी रस्ता अखेर शासनाच्या निधीतून नव्हे, तर ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून करण्यात येणार असल्याने ग्रामस्थांनी 'आता पुरे झालं' असा स्पष्ट संदेश स्थानिक पुढाऱ्यांना दिला आहे. एक वर्षापूर्वी या रस्त्याच्या उद्घाटनप्रसंगी आमदारांनी "माझ्या तीन टर्ममधील सर्वात श्रेष्ठ काम" म्हणून या रस्त्याचे गुणगान केले होते. मात्र त्यानंतर आमदारही गायब आणि रस्त्याचं कामही गायब, अशीच स्थिती निर्माण झाली. ग्रामपंचायतीचे तीन वर्षे ग्रामसभा नाही; अधिकारीही गावात जाण्यास घाबरतात २०१७ साली गाव स्थलांतरित झाल्यानंतरही ग्रामपंचायतीत अनेक अनियमितता सुरूच राहिल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. गावचा विकास थांबवणाऱ्या या कारभाराकडे न पाहता ग्रामपंचायत बरखास्त करण्याचा कोणताही निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला नसल्याने ग्रामस्थ संतप्त आहेत. BDO आणि जिल्हा परिषद CEO यांच्यासह अधिकारी गावात मीटिंग घ्यायलाही टाळाटाळ करतात, अशी स्थिती असून, "गावातील काही पुढाऱ्यांची दहशत किती आहे?" असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. शासनाच्या दारात तीन वर्षे हेलपाटे मारूनही रस्त्याचे काम सुरु झाले नाही. अखेर ग्रामस्थांनी एकत्र येत स्वतःच्या लोकवर्गणीतून रस्ता करण्याचा निर्णय घेतला. "पुढाऱ्यांची खोटी आश्वासने संपली... आता गाव स्वतःचा विकास स्वतःच करणार," असा स्पष्ट संदेश ग्रामस्थांनी दिला आहे.**

## थोडक्यात पण महत्वाचे



### क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

आंबेगाव खुर्द (आरंभ पर्व) : क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या पुण्यतिथीमित्त आंबेगाव खुर्द परिसरात आयोजित अभिवादन कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिलांपासून तरुणांपर्यंत सर्वच समाजघटकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत फुले दांपत्यांविषयीची कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमात देश सेवा फाउंडेशनचे संस्थापक नरेंद्र पारखे यांनी मार्गदर्शन करताना महात्मा फुलेंच्या सामाजिक क्रांतीकारक कार्याचा वेध घेतला. "फुले दांपत्यामुळेच शिक्षण सर्वांसाठी खुले झाले; त्यांच्या संघर्षामुळे समाज जागृत झाला," असे सांगत पारखे यांनी स्त्री-शिक्षण, शेतकरी प्रश्न, बंधुता, समता आणि न्याय या मूल्यांची आजच्या काळातील गरज अधोरेखित केली. "विद्येविना मती गेली..." या महात्मा फुलेंच्या अमोघ तत्त्वज्ञानाचा उल्लेख करत, पारखे म्हणाले की — "शिक्षण, संघटन आणि सामाजिक भान हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे." कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकत्र येत क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन केले.

### महाराष्ट्रातील सरकारी शाळांचे खाजगीकरण; शिक्षण क्षेत्रात खळबळ

पुणे (आरंभ पर्व) : राज्यातील सुमारे ६२ हजार जिल्हा परिषद शाळांचे खाजगीकरण करण्याच्या सरकारच्या प्रस्तावामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. या निर्णयाचा गरीब आणि वंचित विद्यार्थ्यांवर थेट परिणाम होणार असल्याची चिंता शिक्षक, पालक आणि शैक्षणिक तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. सरकारच्या नव्या योजनेनुसार ठराविक व्यापारी किंवा संस्था शाळांचे दत्तकत्व घेणार असून शाळांची सुधारणा, व्यवस्थापन आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात येणार आहे. सरकारचा दावा आहे की या पद्धतीने शालेय शिक्षण अधिक आधुनिक व दर्जेदार होईल. मात्र, शिक्षक संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शविला आहे. सुरुवातीला सुविधा वाढवून नंतर खाजगी शाळांप्रमाणे शुल्कवाढ करून गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. तसेच, कमी वेतनावर शिक्षकांची भरती झाल्यास शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होणार असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे. शिक्षण हक्क कायदा (RTE) आणि संविधानातील कलम ४५ नुसार मोफत व सक्तीचे शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी असताना शाळांचे खाजगीकरण हा निर्णय विरोधाभासी असल्याचे मत तज्ज्ञांचे आहे. या निर्णयाविरोधात राज्यभर शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांकडून आंदोलनाची शक्यता असून लवकरच या मुद्द्याला राजकीय उधाण येण्याची चिन्हे दिसत आहेत. शिक्षण क्षेत्रातील हा मोठा निर्णय पुढील काही दिवसांत कोणते नवे समीकरण तयार करतो याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.









# अध्यक्षपदी राजेंद्र सोनवलकर

## सदाशिव रणदिवे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

आदर्श ग्रामपंचायत गोपाळवाडी गावच्या महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी राजेंद्र मनोहर सोनवलकर यांची तर उपाध्यक्षपदी सदाशिव रणदिवे यांची बिनविरोध निवड करण्यात आली कार्यक्षम सरपंच स्वातीताई राजू पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही ग्रामसभेमध्ये ही निवड करण्यात आली, नवनिर्वाचित अध्यक्ष राजेंद्र सोनवलकर म्हणाले की आदर्श व तंटामुक्त गाव म्हणून ओळख असणाऱ्या गोपाळवाडी गावातील तंटे हे गावातच मिटवले जातील तसेच शैक्षणिक सामाजिक कामसुधा यामागे सुद्धा करत आलो आहे यापुढेही काम करत राहणार यावेळी ग्रामपंचायत अधिकारी झुंबर होळकर उपसरपंच मनिषा ताई भोसले माजी सरपंच गोरख होले माजी सरपंच वैशालीताई शिंदे माजी सरपंच रोहिणी ताई शिंदे माजी सरपंच जयसिंग दादा दरेकर, माजी चेअरमन बाळासाहेब गिरमे, शांताराम होले, माजी उपसरपंच प्रवीण होले, प्रकाश गिरमे,शरद होले,सुरज भुजबळ, पोलीस पाटील वर्षाताई लोणकर, राजू पवार, विजय लव्हे, शिवाजी दरेकर, रघु सुळ, विजय होले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अर्जुन गायकवाड, निलेश शेंडे, डॉ.दत्तात्रय जगताप, अँड किशोर टेकावडे,अक्षय भोसले, लखन शेंडे, आप्पा पवार,गणेश चोरमले यांच्यासह ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सरपंचपदी स्नेहल वाल्हेकर यांची बिनविरोध निवड

**डोणजे (ता. हवेली) (दै. आरंभ पर्व)**

डोणजे (ता. हवेली) — डोणजे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सौ. स्नेहल योगेश वाल्हेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. सरपंचपदासाठी इतर कोणत्याही उमेदवारांनी अर्ज न दिल्याने निवड प्रक्रिया निर्विघ्न पार पडली. सोमवारी पार पडलेल्या विशेष सभेमध्ये ही निवड जाहीर करण्यात आली. सरपंचपदी निवड झाल्यानंतर सौ. वाल्हेकर यांनी गावाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देऊन जलसंधारण, नागरिक सुविधा, रस्ते–पाणी–प्रकाश योजना तसेच महिलांसाठी उपयुक्त उपक्रम राबविण्याची ग्वाही दिली. ग्रामपंचायत सदस्यांनीही सौ. वाल्हेकर यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त करत त्यांच्या कार्यकाळाला पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

यावेळी मा . जिल्हा परिषद सदस्य नवनाथ दादा पारगे, मा सभापती पुजाताई पारगे, संभाजी वाल्हेकर,मारुती कंक अविनाश पारगे,महेश भिलारे अमोल चव्हाण, बाळासाहेब चव्हाण,बाळासाहेब पायगुडे आणि ग्रामस्थ उपस्थित होते .गावात सर्वत्र आनंदाचे वातावरण असून नागरिकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला.

## प्रेयजा सिटीला अंधारातून मुक्ती!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रेयजा सिटीतील नागरिकांना अनेक दिवस त्रास देणारी वीजपुरवठा खंडित होण्याची समस्या अखेर मार्गी लागली आहे. महापालिकेच्या प्रयत्नातून येथे नवीन RMU (Ring Main Unit) आणि ST केबल बसविण्याचे काम पूर्ण झाले असून, परिसरातील विजेची क्षमता आणि स्थिरता मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

या कामामुळे आता परिसरातील वीज दाब कमी होणे, वारंवार होणारे ट्रिपिंग आणि अनियमित पुरवठा या समस्या इतिहासजमा होणार आहेत. अखंडित, सुरक्षित आणि विश्वासार्ह वीजपुरवठ्याची व्यवस्था निर्माण झाल्याने रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिक नागरिकांच्या सततच्या मागणीनंतर हे काम तातडीने हाती घेण्यात आले होते. प्रेयजा सिटीला अंधारातून प्रकाशाच्या मार्गावर नेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून हे उपयुक्त काम पूर्ण करण्यात महेश राजाराम पोकळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.



- **नवीन RMU आणि ST केबलमुळे वीजपुरवठा खंडित होण्याची समस्या संपणार**

नवीन यंत्रणा कार्यान्वित झाल्याने परिसरातील विकास वेग घेण्यास मदत होणार असून, प्रेयजा सिटी खऱ्या अर्थाने उजळण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

## राजगुरुनगर नगरपरिषदेच्या निवडणुकीत सरासरी ६९ टक्के मतदान

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील राजगुरुनगर नगरपरिषदेच्या निवडणुकीत सरासरी ६८.९५ टक्के मतदान झाले. थंडीचा कडाका वाढला असल्याने सकाळी ९ नंतर मतदान केंद्रावर मतदारांची गर्दी काहीशी वाढली. दिवसभर मतदानाला मोठा उत्साह होता. कोणताही अनुचित प्रकार न घडता सर्वत्र शांततेत व उत्साही वातावरणात मतदान प्रक्रीया पार पडली. राजगुरूनगर शहरात मतदारांची संख्या २५८०१ असुन जवळपास ९०० मतदारांची नावे दुबार आली आहेत. या संबंधित मतदारांकडुन याविषयी समंतीपत्र लिहुन घेण्यात आले. राजगुरुनगर शहरातील एकुण ७ ठिकाणी ३४ मतदान केंद्रावर मतदारांनी मतदान केले. मतदारांना मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास प्रतिबंध करण्यात आला होता. प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवारांचे प्रतिनिधी, पक्षाचे नेते, कार्यकर्ते यांनी गर्दी केली होती. वाडा रस्त्यावरील महात्मा गांधी विद्यालयात सर्वाधिक मतदान केंद्र असल्याने मतदान केंद्राबाहेर दिवसभर तेथे मोठी गर्दी होती. सकाळी साडेअकरा वाजता १७.२४ टक्के मतदान झाले. दुपारी दीड वाजेपर्यंत ३७.८८ टक्के, साडेतीन वाजेपर्यत ५३.४४ टक्के, तर संध्याकाळी साडेपाच वाजेपर्यंत सरासरी ६८.९५ टक्के मतदान झाले.

मतदान केंद्राजवळ पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते. मतदारांना मतदान केंद्रावर नेण्यासाठी स्वयंसेवक, कार्यकर्ते व नगरपरिषद कर्मचारी मदत करत होते. दिव्यांग मतदारांना चाकाच्या खुर्चीवरून मतदान केंद्रावर नेण्याची व्यवस्था केली होती.



# घरगुती हिंसाचार : महिलांची घुसमट

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

आज आपण एकीकडे 'महिला सक्षमीकरण' आणि 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' यासारख्या घोषणा देत असलो, तरी दुसरीकडे घरगुती हिंसाचार (Domestic Violence) हे आपल्या समाजातील एक भयानक आणि कटू सत्य आहे. अनेक स्त्रिया आजही आपल्याच घरात, आपल्याच लोकांकडून होणाऱ्या अन्यायाच्या बळी ठरत आहेत.

हा विषय केवळ पती-पत्नीमधील भांडणापुरता मर्यादित नसून, तो मानवी हक्कांचे उल्लंघन करणारा एक गंभीर गुन्हा आहे. या विषयावर प्रकाश टाकणारे काही महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:



१. **हिंसाचार म्हणजे नक्की काय? (What constitutes violence?)**

अनेकदा स्त्रियांना वाटते की फक्त मारहाण करणे म्हणजेच हिंसाचार, पण कायद्यानुसार आणि मानवाधिकारानुसार याचे स्वरूप व्यापक आहे:

- शारीरिक हिंसा (Physical Violence): मारहाण करणे, ढकलणे, वस्तू फेकून मारणे किंवा इजा पोहोचवणे.
- मानसिक/शाब्दिक हिंसा (Emotional/Verbal Abuse): सतत अपमान करणे, टोमणे मारणे, चारचौघात कमी लेखणे, चारित्र्यावर संशय घेणे किंवा धमकावणे.
- आर्थिक हिंसा (Economic Abuse): स्त्रीला नोकरी करण्यापासून रोखणे, तिचे पगार/पैसे काढून घेणे किंवा तिला खर्चासाठी पैशांपासून वंचित ठेवणे.
- लैंगिक हिंसा (Sexual Violence): मनाविरुद्ध शारीरिक संबंधांची सक्ती करणे.

२. **हिंसाचाराची प्रमुख कारणे (Major Causes)**

सुशिक्षित असो वा अशिक्षित, शहरी भाग असो वा ग्रामीण, घरगुती हिंसाचार सर्वत्र दिसून येतो. याची काही मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत:

- पुरुषप्रधान मानसिकता: आजही समाजात 'पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री दुय्यम' ही भावना प्रबळ आहे. स्त्रियांवर मालकी हक्क गाजवण्याच्या वृत्तीतून हिंसाचार होतो.
- व्यसनाधीनता: दारू किंवा जुगाराच्या व्यसनामुळे अनेक घरांमध्ये स्त्रियांना मारहाणीला सामोरे जावे लागते.
- हुंडा आणि आर्थिक लोभ: हुंड्यासाठी किंवा माहेरून पैसे आणण्यासाठी होणारा छळ हे एक मोठे कारण आहे.
- भीती आणि मौन: "लोक काय म्हणतील?" या भीतीने किंवा मुलांच्या भविष्याचा विचार करून अनेक स्त्रिया अन्याय सहन करतात, ज्यामुळे गुन्हेगारांचे धैर्य वाढते.

३. **पीडितेवर आणि कुटुंबावर होणारे परिणाम (Impact)**

घरगुती हिंसाचाराचे परिणाम केवळ त्या स्त्रीपुरते मर्यादित राहत नाहीत:

- शारीरिक आणि मानसिक आरोग्य: सततच्या तणावामुळे स्त्रियांना नैराश्य (Depression), चिंता आणि गंभीर शारीरिक आजार जडतात.
- मुलांवर होणारा परिणाम: जी मुले घरात आईला मार खाताना पाहतात, त्यांच्या मनावर खोलवर परिणाम होतो. ही मुले भविष्यात आक्रमक बनू शकतात किंवा स्वतःला अत्यंत असुरक्षित मानू शकतात.
- आत्मविश्वास नष्ट होणे: सततच्या अपमानामुळे स्त्रीचा स्वतःवरचा विश्वास उडतो आणि ती स्वतःला दोषी मानू लागते.

> **घरगुती हिंसाचार ही कुणा एका स्त्रीची खासगी समस्या नसून ती एक सामाजिक कीड आहे. जोपर्यंत आपण आपल्या मुलींना "सहन कर" हे शिकवण्याऐवजी "अन्यायाविरुद्ध लढ" हे शिकवत नाही, तोपर्यंत हे चित्र बदलणार नाही. घर हे सुरक्षिततेचे ठिकाण असायला हवे, भीतीचे नाही.**

४. **उपाय आणि कायदा (Solutions and Laws)**

या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी काही कायदेशीर आणि सामाजिक मार्ग उपलब्ध आहेत:

- कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ (PWDVA 2005): हा कायदा पीडित महिलेला घराचा हक्क, आर्थिक मदत आणि संरक्षणाची हमी देतो.
- मौन सोडणे: सर्वात पहिले आणि महत्त्वाचे पाऊल म्हणजे गप्प न राहता आवाजा उठवणे.
- मदत मागणे: पोलीस, महिला आयोग, किंवा '१०९१' (वुमन हेल्पलाइन) सारख्या हेल्पलाइनवर संपर्क साधणे.
- सुपदेशन (Counseling): पती-पत्नी दोघांचे समुपदेशन करून काही वेळा प्रश्न सोडवता येतात, पण हिंसाचार थांबला नाही तर कायदेशीर मार्गच योग्य ठरतो.
- आर्थिक स्वावलंबन: स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल, तर ती अन्यायाविरुद्ध अधिक ताकदीने उभी राहू शकते.

## रोहिणीताई राहणे यांच्या पुढाकाराने भव्य आरोग्य तपासणी शिबिर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर सचिव भारतीय जनता पार्टी तसेच प्रभाग 33 मधून इच्छुक असलेल्या सौ. रोहिणी ताई राहणे यांच्या सामाजिक बांधिलकीतून दिनांक 2 डिसेंबर मंगळवारी उत्तम नगर न्यू कोपरे परिसरात मोफत भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. परिसरातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत विविध महत्त्वाच्या तपासण्या एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा हा प्रशंसनीय उपक्रम ठरला.

या शिबिरात सीबीसी टेस्ट, डायबिटीज तपासणी, बीपी, कोलेस्ट्रॉल तपासणी, डोळ्यांची तपासणी, ईसीजी अशा अत्यावश्यक आणि नियमित आरोग्य तपासण्यांचा समावेश होता. नागरिकांची गर्दी पाहता शिबिराला परिसरातील लोकांनी किती महत्त्व दिले याचा प्रत्यय आला. एकूण 300 नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत आपल्या आरोग्याविषयी आवश्यक माहिती जाणून घेतली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्रीनिवासजी खिस्ते (सहसंयोजक, भाजपा सोशल मीडिया, महाराष्ट्र प्रदेश) व श्री मंगेश भुसारी (स्वयंसेवक, राष्ट्रीय संघ, पुणे) यांनी उपस्थित राहून उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी समाजासाठी अशा आरोग्य उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

तसेच भारतीय जनता पार्टीचे उमेश दादा सरपाटील, सायली भोसले, चेतन गोंडाळ, राजू पाटील, अमोल रायकर, ज्योती गोंडाळ, योगिता सहेंद्रकर, कुसुम नागरे, तृप्ती बर्डे, अजय बाबर, अभि कांबळे, राजू ननावरे यांच्यासह सूर्योदय वृद्धाश्रमाच्या संचालिका छायाताई भगत यांनीही उपस्थित राहून शिबिरात सक्रिय सहभाग घेतला.

शिबिराला भेट देणाऱ्या नागरिकांनी सांगितले की, "आरोग्य तपासणीसाठी मोठ्या रुग्णालयात जाण्याची गरज नाही. रोहिणी ताईंनी आमच्या परिसरातच हा उत्तम उपक्रम राबवला. तपासण्या, मार्गदर्शन आणि सेवा याचा आम्हाला खूप फायदा झाला."

रोहिणी ताई राहणे यांनी सांगितले की, "समाजातील प्रत्येक व्यक्ती निरोगी असावी, हीच आमची प्राथमिकता आहे. अशा उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना वेळेवर तपासणीची सुविधा मिळावी, हा हेतू आहे."

या आरोग्य शिबिरामुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी भविष्यातही अशाच उपक्रमांच्या अपेक्षा व्यक्त केल्या. रोहिणी ताई राहणे यांचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अखेर रुपाली ठोंबरे यांचा राजीनामा

- पक्षात खळबळ; पुढील राजकीय हालचालींकडे सर्वांचे लक्ष

पुणे (आरंभ पर्व) : अखेर दीर्घ चर्चेनंतर आणि वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर रुपाली ठोंबरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा सादर केला आहे. मागील काही महिन्यांपासून पक्षातील अंतर्गत मतभेद, निर्णयप्रक्रियेत होणारे दुर्लक्ष आणि कार्यक्षेत्रातील वाढता ताण यामुळे ठोंबरे नाराज असल्याची चर्चा होती. अखेर त्यांनी औपचारिकपणे पद सोडण्याचा निर्णय घेतल्याने पक्षात मोठी खळबळ उडाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, काही महत्त्वाच्या स्थानिक मुद्द्यांवर त्यांचे मत वारंवार डावलले जात होते. कार्यकर्त्यांनी मांडलेल्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याने असंतोष वाढत गेला. अखेर परिस्थिती असह्य झाल्यानंतर त्यांनी पायउतार होण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. ठोंबरे यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्या समर्थकांत नाराजीचे वातावरण आहे. काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी तातडीच्या बैठका घेऊन पुढील भूमिका ठरवण्याची चर्चा सुरू केली आहे. पक्ष नेतृत्व आता त्यांच्या जागी नवीन नियुक्ती कोणाची करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, रुपाली ठोंबरे पुढे कोणता राजकीय मार्ग अवलंबणार? स्वतंत्र भूमिका घेत नवीन दिशा देणार का? की दुसऱ्या पक्षाकडे झुकतील? याबाबत विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. स्थानिक राजकीय समीकरणांवर त्यांच्या निर्णयाचा मोठा परिणाम होणार हे निश्चित.



### Ultraviolette चा ४८ तासांत मुंबई आणि पुण्यात सहा ठिकाणी विस्तार

पुणे (आरंभ पर्व) : मल्टी टेरेन मोटरसायकल आणि UV Crossfade या त्यांच्या पहिल्या रडार कम्युनिकेशनसह असलेल्या कार्बन फायबर हेल्मेटसह X-47 Crossover च्या यशस्वी सादरीकरणानंतर Ultraviolette ने केवळ 48 तासांमध्ये महाराष्ट्रात सहा अत्याधुनिक Experience Centres सुरू करून त्यांच्या राष्ट्रव्यापी स्थानाचा वेग वाढवला आहे. मुंबईतील अंधेरी, वाशी आणि ठाणे तसेच पुण्यातील शिवाजीनगर, बाणेर आणि खराडी या महत्त्वाच्या ठिकाणी स्थापित केलेल्या या स्पेस स्टेशन्स मुळे Ultraviolette च्या जलद वाढीच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ही कामगिरी केवळ भारतात आपले स्थान मोठ्या प्रमाणावर वाढवण्याच्या Ultraviolette च्या दृढ वचनबद्धतेला अधोरेखित करते असे नाही तर कामगिरी प्रणीत, शाश्वत आणि भविष्याभिमुख दळणवळण सुविधा वाहकांना उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या बांधिलकीला अधिक बळकटी मिळवून देते. एकाच छताखाली रिटेल आणि सर्व्हिसच्या वैशिष्ट्यपूर्ण सुविधा तयार करून ग्राहकांन ब्रँडचे तंत्रज्ञान, डिझाईन आणि नाविन्यपूर्णता जवळून अनुभवता येते.

### 'आयआयएम बंगळुरू'चे इन्क्युबेशन 'समावेश'कडून पूर्ण

पुणे (आरंभ पर्व) : ग्रामीण भागातील विद्यार्थी व स्थलांतरीत युवकांसाठी कार्यरत 'समावेश' संस्थेने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) बंगळुरूच्या 'एनएसआरसेल'मार्फत वर्षभराचे इन्क्युबेशन यशस्वीपणे पूर्ण केले हे. हा एक मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम असून, यामध्ये संस्थेची क्षमता-वृद्धी, संघटनात्मक विकास आणि परिणामाधारित फ्रेमवर्क विकसित करण्यावर भर दिला गेला. त्यातून संस्थेच्या कार्याची व्याप्ती आणि प्रभाव अधिक परिणामकारक होणार आहे. कागदपत्रांची पूर्तता, शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि उच्च शिक्षणातील प्रवेश या तीन मुद्द्यांवर 'समावेश' संस्थेचे काम केंद्रित आहे. गेल्या वर्षभरात (२०२४–२५) ११३० हून अधिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे शैक्षणिक मार्गदर्शन, २५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, ५०० पेक्षा अधिक तरुणांना आवश्यक कागदपत्रांची पूर्ततेसाठी सहाय्य केले आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठांत शिष्यवृत्तीवर जाण्यासाठी मार्गदर्शन केले गेले. याची दखल घेत आयआयएम बंगळुरूच्या 'एनएसआरसेल'च्या इन्क्युबेशनसाठी 'समावेश'ची निवड केली गेली.

### पुण्यात एनडीएत पत्रकारांचा अपमान; पासिंग आऊट परेडवर बहिष्कार

पुणे (आरंभ पर्व) : प्रसार माध्यमांमुळे आमच्याकडे येणाऱ्या व्हीव्हीआयपींना त्रास होतो. मागच्या वर्षी तुमच्यामुळे एनडीएच्या पीओपीचा फ्लॉप शो झाला...हे बोल रविवारी भल्या पहाटे ५.३० वाजता पुण्यातील पत्रकारांना एनडीएच्या अधिकाऱ्यांनी सुनावले. या शब्दांनी व्यथीत झालेल्या सर्व प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी कार्यक्रमावर बहिष्कार टाकत परेड सोडले. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव पत्रकारांना पहाटे ५.३० ते दुपारी १२ पर्यंत तेथेच अडकून पडावे लागले. खडकवासला येथे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची (एनडीए) स्थापना झाली तेव्हापासून पुण्यातील प्रसारमाध्यमे नोव्हेंबर आणि मे महिन्यातील पासिंग आऊट परेडचे लाईव्ह वार्तांकन करतात. यात देशसेवेत जाणाऱ्या देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कॅडेटसह आई-वडीलांचा नातेवाइकांचा सन्मान होतो. एनडीएच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गौरवगाथांवर बातम्या, लेख प्रसिध्द होतात. मात्र याची कोणतीही जाणीव एनडीए प्रशासनातील अधिकाऱ्यांना नसल्याचा प्रत्यय रविवारी अनुभवास आला. रविवारी (३० नोव्हेंबर) झालेल्या १४९ व्या तुकडीच्या पासिंग आऊट परेडच्या वार्तांकनासाठी आलेल्या पत्रकार आणि फोटोग्राफर यांना एनडीए प्रशासनाकडून अपमानास्पद वागणूक देण्यात आली. हा प्रकार अत्यंत निंदनीय आणि निषेधार्ह आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी पत्रकारांची पूर्वनोंदणी दहा दिवस आधीच करून घेतली होती. कार्यक्रमास्थळी पत्रकारांसाठी असलेली बैठक व्यवस्था या वेळी अचानक बदलण्यात आली.

# मा. नगरसेविका सायली वांजळे शिंदे आयोजित

# होम मिनिस्टर कार्यक्रमाला ७ हजार महिलांची उपस्थिती!

## पहिल्या बक्षिसाच्या विजेत्या आईची भावनिक कहाणी सर्वांच्या डोळ्यांत पाणी आणणारी!!

**पुणे - लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३२ मध्ये माजी नगरसेविका सायलीताई रमेशभाऊ वांजळे शिंदे यांनी आयोजित केलेला होम मिनिस्टर आणि भव्य लकी ड्रॉ कार्यक्रम महिला शक्तीचा अनोखा उत्सव ठरला. बेंगलोर हायवेवरील आर. एम. डी. कॉलेज ग्राउंडवर झालेल्या या सोहळ्यास तब्बल ७ हजारांहून अधिक महिला भगिनींनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली. मैदान भरून वाहत असलेली गर्दी आणि चेहऱ्यावरचा आनंद यावरून सायलीताईंवरील महिलांचे प्रेम आणि विश्वास स्पष्टपणे जाणवत होता.





लावणी सम्राज्ञी स्वाती थोपटे यांनी सादर केलेल्या लावणीने उपस्थितांची मनं जिंकली, तर अभिनेता ओम यादव यांनी होम मिनिस्टर खेळांचे सादरीकरण करत विनोद आणि ऊर्जा यांचा सुंदर मिलाफ साधला. महिलांनी घेतलेला सहभाग आणि खेळांतील उत्साहामुळे संपूर्ण वातावरण उत्सवमय बनले.

लकी ड्रॉमध्ये २० महिलांना शिवण मशीन देण्यात आली, तर होम मिनिस्टरमध्ये विजेत्यांसाठी भरघोस बक्षिसांची मेजवानी होती—पहिल्या क्रमांकासाठी जुपिटर गाडी, दुसऱ्या क्रमांकासाठी एलईडी टीव्ही, तिसऱ्यास फ्रिज, चौथ्यास वॉशिंग मशीन आणि पाचव्याला मायक्रोवेव्ह ओव्हन.

पण संपूर्ण कार्यक्रमात सर्वाधिक भावनिक ठरला तो पहिल्या बक्षिसाच्या विजेत्या आईचा क्षण.

त्या डोळ्यांत पाणी आणत म्हणाल्या— "माझ्या लहान मुलाने मला घरातून निघताना म्हणालं होतं, 'मम्मी, तू नक्की जिंकून गाडी घेऊन ये!' पण त्याच दिवशी त्याला भयंकर ताप आला... दवाखान्यात ने-आण करताना जीव घट्ट झाला होता. कार्यक्रमाला येऊ की नाही असं वाटलं... पण मुलानेच आग्रह धरला—'जा मम्मी, तू नक्की जिंकशील!' आज त्याचा शब्द खरा झाला."

त्यांची ही कहाणी ऐकताच मैदानात उपस्थित हजारो महिलांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. मातृत्व, संघर्ष आणि यशाचा हा सुंदर संगम असलेला क्षण सर्वांच्या मनाला स्पर्शून गेला. कार्यक्रमाला विविध मान्यवरांनी उपस्थित राहून सायलीताईंना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या कामाचे भरभरून कौतुक केले. सायली वांजळे शिंदे यांनी प्रभागातील महिलांसाठी केलेले हे आयोजन केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नव्हता तो होता महिलांच्या स्वप्नांचा, भावनांचा आणि सन्मानाचा उत्सव.

प्रभाग ३२ मध्ये हा सोहळा दीर्घकाळ स्मरणात राहील, कारण इथे मिळालेले क्षण फक्त आनंदाचे नव्हते... ते हृदयात कायम राहतील असे भावनिक होते. अभिनेता ओम यादव यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

> **अभिनेता ओम यादव यांनी या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन करत उपस्थितांची मनं जिंकली. त्यांच्या दमदार आवाजाने आणि सहजसुंदर निवेदनशैलीमुळे संपूर्ण कार्यक्रमाला एक वेगळं रंगतदार स्वरूप मिळालं. प्रसंगोपात विनोदी टिप्पणी, योग्य ठिकाणी केलेले संवेदनशील उल्लेख आणि पाहुण्यांशी साधलेला सुंदर संवाद यामुळे कार्यक्रम अधिक आकर्षक आणि उत्साही झाला. ओम यादव यांनी मंचावरची ऊर्जा कायम टिकवून ठेवत कार्यक्रम सुरळीत, उत्कट आणि प्रेक्षकांच्या मनाला भावेल असा पार पाडला.**

## IFFI २०२५ गोवा येथे महाराष्ट्राने सादर केला योजनांचा खजिना

**पणजी, गोवा (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र फिल्म, रंगमंच व सांस्कृतिक विकास महामंडल लिमिटेड (MFSCDCL) ने गोव्यात सुरू असलेल्या ५६व्या आंतरराष्ट्रीय फिल्म महोत्सव भारत (IFFI 2025) मध्ये आपली दमदार उपस्थिती नोंदवली आणि महाराष्ट्राला भारताची तसेच जागतिक पातळीवरील आघाडीची चित्रिकरण राजधानी म्हणून पुन्हा एकदा भक्कमपणे सादर केले. "महाराष्ट्र : चित्रिकरण स्थळ म्हणून – संधी आणि अंतर्दृष्टी" या विषयावरील विशेष पॅनल चर्चेत MFSCDCL ने राज्याच्या चित्रपट-अनुकूल व्यवस्थेचे तीन मजबूत आधारस्तंभ अधोरेखित केले – देशातील सर्वात जलद एकखिडकी प्रणाली, मराठी चित्रपटांसाठी सर्वात उदार प्रोत्साहन पॅकेज आणि भविष्यकाळासाठी सज्ज विश्वस्तरीय पायाभूत सुविधा. ऑनलाइन पोर्टल www.filmcell.maharashtra.



gov.in ने १४ सरकारी विभाग व १०५ उप-विभागांना एकाच व्यासपीठावर आणले असून सर्व शूटिंग परवानग्या केवळ ७ कार्य दिवसांत देण्याची हमी दिली आहे; विलंब झाल्यास स्वयंचलित मान्यता (Deemed Approval) मिळते, ज्यामुळे प्रशासकीय अडथळे जवळजवळ पूर्णपणे संपुष्टात आले आहेत.

## गॅस गळतीमुळे झालेल्या स्फोटाने लोणी काळभोर हादरले

**लोणी काळभोर- चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**

लोणी काळभोर. (ता. हवेली) ग्रामपंचायतीच्या हद्दीत नेहरू चौकाजवळील जगताप हाईट्स या इमारतीमध्ये सोमवारी (१ डिसेंबर) सकाळी साडेदहाच्या सुमारास गॅस गळतीमुळे अचानक झालेल्या भीषण स्फोटाने परिसर हादरला. या घटनेत घरातील करूणा मनोज जगताप या महिला गंभीर भाजल्या असून तुटलेल्या खिडकीचा लोखंडी फ्रेम रस्त्यावर पडून दुचाकीस्वार तरुण जखमी झाला आहे.

करुणा जगताप या स्फोटाच्या वेळी घरात एकट्या होत्या. घरात दोन गॅस सिलेंडर, गॅस गिझर तसेच दिवाळीला आणलेले काही फटाके ठेवलेले होते. प्राथमिक माहितीनुसार, सिलेंडरमधून गॅस गळती होऊन अचानक मोठा स्फोट झाला. याचवेळी घरात राहिलेले फटाके पेटल्याने स्फोटाचा आवाज अधिक वाढला.

स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की, घरातील दरवाजे, खिडक्या पूर्णपणे तुटून पडले. घरातील कपाटे, इलेक्ट्रॉनिक साहित्य, भांडी तसेच गृहोपयोगी वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले. आग भडकताच घरातील धूर संपूर्ण कॉरिडॉरमध्ये पसरला.



नेहरू चौकाच्या रस्त्यावरून तिघेजण दुचाकीवरून जात असताना खिडकीचा तुटलेला लोखंडी चौकट खाली पडला. त्यातल्या एका तरुणाच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्याचा हात फ्रॅक्चर झाल्याची प्राथमिक माहिती आहे. अचानक घडलेली ही घटना पाहून रस्त्यावर उपस्थित नागरिकांनीही एकच धावपळ केली.

घटनेची माहिती मिळताच लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश बोराटे, पोलीस उपनिरीक्षक माळी, सहाय्यक फौजदार रामदास मेमाणे, पोलीस हवालदार मंगेश नानापुरे, मल्हारी ढमढेरे तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच नागेश काळभोर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

स्थानिक नागरिकांच्या मदतीने घरातील आग विझवण्यात आली. त्यानंतर महाराजा रुग्णवाहिकेतून करूणा जगताप व जखमी तरुणाला तातडीने जवळील मोठ्या खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. थोड्याच वेळात अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी संपूर्ण घरात पाण्याची फवारणी करून शिल्लक उष्णता आणि धग नियंत्रणात आणली.

स्फोटाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. गॅस गळती, गिझरमध्ये बिघाड किंवा घरात असलेल्या फटाक्यांचा सहभाग यापैकी कोणत्या कारणामुळे हा स्फोट झाला याबाबत फोरेन्सिक टीम तपास करत आहे. करूणा जगताप यांची प्रकृती गंभीर रुग्णालयातून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार करूणा जगताप या गंभीर भाजल्या असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर तरुणाचा हात फ्रॅक्चर झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.लोणी काळभोर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## मालखेडमध्ये तासगांवकर मेडिकल फाऊंडेशनतर्फे नेत्ररोग तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

### कै. अथर्व दिपक चौधरी स्मृतीप्रीत्यर्थ नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन





**मालखेड - विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

तासगांवकर मेडिकल फाऊंडेशनच्या सिल्व्हर लाईन हॉस्पिटल, मालखेड यांच्या वतीने कै. अथर्व दिपक चौधरी स्मृतीप्रीत्यर्थ नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत भरलेल्या या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

शिबिरात विशेष नेत्रतज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदू तपासणी, दृष्टिदोष ओळख, तसेच गरजूंना प्राथमिक नेत्रउपचार सल्ला देण्यात आला. विविध वयोगटातील अनेकांनी तपासणी करून घेतली असून अनेकांना तात्काळ निदानाचा लाभ मिळाला.

या शिबिराचे आयोजन दिवंगत अथर्व दिपक चौधरी यांच्या स्मरणार्थ करण्यात आले होते. त्यामुळे कार्यक्रमाला भावनिक स्वरूप लाभले. सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांचे आयोजन नियमितपणे व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुमित तासगांवकर, डॉ. स्नेहल तासगांवकर, डॉ. पायल जाधव, विश्ववल्लभ नेत्रालयाचे डॉ. आबासाहेब गडदे यांचे विशेष योगदान राहिले. तसेच गावच्या सरपंच नंदाताई जोरी, राकेश जोरी, रितेश जोरी, सदाशिव भालेराव यांच्यासह मालखेड–वरदाडे परिसरातील ग्रामस्थ व स्थानिक नागरिकांनी शिबिरातील सेवा, व्यवस्थापन आणि डॉक्टरांच्या समर्पित कार्याचे कौतुक केले.

## एचडीएफसी बँकेतर्फे ५ डिसेंबर रोजी रक्तदान मोहिमेचे आयोजन

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे त्यांच्या राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या रक्तदान मोहिमेचे आयोजन त्यांच्या महत्त्वपूर्ण अशा सीएसआर उपक्रम असलेल्या परिवर्तनच्या अंतर्गत करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे आयोजन संपूर्ण भारतातील ११०० शहरांत ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० ते संध्याकाळी ५.३० दरम्यान करण्यात येणार आहे.

यामध्ये एचडीएफसी बँकेचे कर्मचारी, ग्राहक, कॉर्पोरेट्स, संरक्षण क्षेत्रात कार्यरत सदस्य, विद्यार्थी आणि नागरीक सहभागी होणार आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून एचडीएफसी बँकेकडून समाजाच्या कल्याणासाठीची वचनबध्दता अधोरेखित होत असून सातत्याने देशाच्या सुरक्षित आणि वेळेत रक्त उपलब्ध करुन देण्यासाठीचा सहयोग अधोरेखित होत आहे. वार्षिक रक्तदान मोहिम ही बँकेच्या सीएसआर अंतर्गत आयोजित करण्यात येणारा पहिला उपक्रम असून तो बँकेच्या आरोग्य आणि स्वच्छता विभागाच्या अंतर्गत आयोजित केला जातो.

HDFC BANK | PARIVARTAN A step towards sustainable progress

एचडीएफसी बँकेचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कैझाद भरुचा यांनी सांगितले " अनेक वर्षांपासून या उपक्रमाच्या माध्यमातून एकाच लक्ष्यासाठी अनेक लोक एकत्र येत आहेत. रक्त दान करणे ही एक सोपी गोष्ट आहे ज्यामुळे कोणाचा तरी जीव वाचू शकतो. आम्ही स्वयंसेवक आणि भागीदारांचे आभारी आहोत जे दरवर्षी या प्रयत्नांना सहकार्य करतात."

एचडीएफसी बँकेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर श्री भावेश झवेरी यांनी सांगितले " वार्षिक रक्तदान मोहिमेला दरवर्षी अगदी उत्साहाने वाढता प्रतिसाद मिळत असतो कारण आमचे कर्मचारी आणि भागीदार अगदी संघभावनेने वाहून घेऊन काम करत असतात. हा उपक्रम सातत्याने वाढीस लागल्या बद्दल आम्हाला अभिमान वाटतो आणि आम्ही नेहमीच देशाच्या आरोग्यव्यवस्थेत आमचे योगदान देण्यास वचनबध्द आहोत.

प्रत्येक दाता हा एकत्रित प्रयत्न करुन त्यांचे सक्षम योगदान देत असतो."

दरवर्षी बँकेतर्फे प्रतिथयश अशा रक्तपेढ्या आणि आरोग्य संस्थांबरोबर काम करुन सुरक्षित, पारदर्शक आणि वैद्यकीय निकषांचे पालन करुन काम करत असते. या वर्षी या मोहिमेचे आयोजन हे संपूर्ण देशभरांतील प्रतिथयश अशा रक्तपेढ्या, सरकारी विभाग आणि सामाजिक संस्थांबरोबरच्या भागीदारीतून करण्यात येत आहे.

ही मोहिम १८ ते ६० वर्षे वयोगटांतील सर्व पात्र निरोगी रक्तदात्यांसाठी खुली आहे. इच्छूक व्यक्ती शिबीराच्या स्थानी भेट देऊन रक्तदान करु शकतात. स्थानांविषयीची संपूर्ण माहिती ही एचडीएफसी बँकेच्या वेबसाईटवर त्या तारखेपर्यंत उपलब्ध असेल.

२००७ मध्ये सुरु केल्या पासून हा उपक्रम सातत्याने वाढला आहे, सुरुवातीला ८८ केंद्रांमधून ४,३८५ युनिट्स रक्त गोळा होण्यापासून २०२४ मध्ये हीच संख्या ५,५३३ कँप्सच्या माध्यमातून ३.३० लाख बाटल्या रक्त हे १,४०८ ठिकाणांहून गोळा करण्यात यश प्राप्त झाले आहे. २०१३ च्या परिवर्तन रक्तदान शिबीराने एकाच दिवशी विविध ठिकाणांहून रक्तदान करण्यासाठीचा गिनेस बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये येण्याचा मान प्राप्त केला आहे.

### रक्तदान करण्यासाठी आवश्यक पात्रता

- रक्तदात्याचे वय हे १८ ते ६० दरम्यान असावे
- यापूर्वी किमान तीन महिन्यांपूर्वी रक्तदान केलेले नसावे.
- दात्याला गेल्या आठवड्याभरात ताप, खोकला किंवा सर्दीचा त्रास नसावा.
- रक्त देण्यापूर्वी दात्याने किमान ३ तास आधी हलका नास्ता केलेला असावा. रक्तदान हे उपाशी पोटी करु नये.
- रक्त देण्यापूर्वी दात्याने दोन ग्लास पाणी प्यावे.
- रक्तदान करण्याच्या किमान चार ते सहा तास आधी दात्याने धुम्रपान किंवा तंबाकू सेवन करु नये.
- रक्तदान करण्यापूर्वी दात्याने २४ तास आधी अल्कोहोलचे सेवन करु नये.
- नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दात्याने सत्य कथनाने द्यावीत.
- वजन, हिमोग्लोबिनचा स्तर, रक्तदान आणि एकूण फिटनेस च्या निकषांनुसारच रक्तदान करण्याची परवानगी देण्यात येईल.

ज्या कोणाला या रक्तदान मोहिमेत सहभागी व्हायचे आहे ते ५ डिसेंबर २०२५ रोजी शिबीर स्थानी पोहोचावे. त्यानंतर दात्याच्या सुरक्षेसाठी एक छोटी वैद्यकीय चाचणी आणि नोंदणी करुन घेतली जाईल. शिबीराच्या स्थाना विषयीच्या आणि अन्य अधिक माहितीसाठी कृपया एचडीएफसी बँकेची वेबसाईट आणि समाज माध्यमांना भेट द्या.